मराठी साहित्य मंडळ,
कलबुरगी (गुलबर्गा)
या संस्थेचे त्रैमासिक

# भाव अनुबंध

Scanned with CamScanner

मराठी साहित्य मंडळ, गुलबर्गा
या संस्थेचे त्रैमासिक

# भाव अनुबंध

वर्ष : ६
अंक : ४
आषाढ, श्रावण, भाद्रपद शके १९४२
जुलै, ऑगस्ट, सप्टेंबर २०२०

संपादक : श्री. भीमसेनराव माड्याळकर
कार्यकारी संपादक : श्री. सर्वोत्तम सताळकर
निवास (०८४७२) २५५८७८ / ०९२४२१९३७९२

संपादक मंडळ
श्री. विद्याधर मुरुगकर ★ श्री. व्यंकटेश वळसंगकर
सौ. वंदना किणीकर ★ डॉ. विजया तेलंग

संस्थेचा पत्ता : मराठी साहित्य मंडळ, स्टेशन बाजार,
गुलबर्गा (कलबुर्गी) ५८५१०२.
दूरभाष : कार्या. (०८४७२) २३२२०७ email-s.satalkar@yahoo.com
वेळ : सकाळी ८ ते ११ व सायं. ५ ते ८. गुरुवारी साप्ताहिक सुट्टी.

या अंकाचे मूल्य : रु. ५०/-
वार्षिक वर्गणी - वैयक्तिक रु. ३००/-, संस्थेसाठी रु. ४००/-
वर्गणी कुठल्याही महिन्यापासून चेक, डीडी अथवा मनीऑर्डरच्या माध्यमाने 'Editor Anubandh' या नावाने पाठवावी.

( संपादकीय व व्यवस्थापकीय पत्रव्यवहार, अभिप्रायार्थ भेट पुस्तके, नियतकालिके, प्रसिद्धीसाठी साहित्य इ. कार्यकारी संपादकांच्या नावे संस्थेच्या पत्त्यावर पाठवावे. प्रसिद्धीसाठी साहित्य ईमेल वरही पाठविता येईल. या अंकातील लेखांत व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.)

Scanned with CamScanner

- संपादकीय..... ३
- **मराठी साहित्यात वऱ्हाडी भाषेचे योगदान** / सुरेश साबळे ७
- **नागरी समाजाची घुसमट मांडणारी कविता** /
  प्रा. डॉ. संग्राम गोपीनाथ थोरात १७
- **स्मरण बाबुराव अर्नाळकरांचे** / सर्वोत्तम सताळकर ३१
- **माझी बालकविता : एक दृष्टिक्षेप** / प्रा. व्यंकटेश वळसंगकर ३८
- **वाणीयाची मुलगी (कथा)** / सौ. राधिका घोगले ४२
- **माझे मामा** / मीनाक्षी बक्षी ४९
- **नचिकेताची कथा आणि लक्ष्मीचे महत्त्व** /
  डॉ. सूर्यकांत डी. चव्हाण ६५
- **लढाई कोरोनाशी - ढाल आयुर्वेदाची** /
  डॉ. सौ. आरती श्रीनिवास संदीकर ७१
- **कविता.... कविता.... कविता.... कविता....** ७६
- **त्रिगुण तांबूल !** / मुरलीधर हरी अभ्यंकर ८०
- **एका संसाराची कहाणी** / सुनील चौधरी ८६
- **संशोधनाची प्रगल्भता : मराठीतील सत्य, शिव आणि सौंदर्य विचार** / महादेव वराठकर ९१
- **मंडळाची वाटचाल.....** ९५

# नागरी समाजाची घुसमट मांडणारी कविता

• प्रा. डॉ. संग्राम गोपीनाथ थोरात

**प्रस्तावना**

इंदापूरसारख्या ग्रामीण भागातून शिक्षणासाठी पुण्यासारख्या महानगरात आलेल्या सुशीलकुमार शिंदे यांच्या 'शहर आत्महत्या करायचं म्हणतंय.....!' या काव्यसंग्रहास साहित्य अकादमीचा युवा पुरस्कार मिळाला. ह्या संवेदनशील कवीने पुरस्कारादाखल मिळालेली पन्नास हजारांची रक्कम मुख्यमंत्री साहाय्यता निधीला दिली. ह्या दोन घटना एक नवकवी व त्याच्या कलाकृतीबद्दल घडतात. त्याचं मूळ शोधायला गेल्यावर असं दिसतं की, सुशीलकुमार या युवा कवीची ग्रामीणतेची नाळ अजूनही तुटलेली नाही आणि त्याचबरोबर शहरीकरणामध्ये लोकांची होणारी घुसमटही त्याच्या मन:पटलावर स्पष्ट उमटताना दिसते. अशा संवेदनशील जाणिवेतूनच 'शहर....'ची निर्मिती झाली असावी असे मला वाटते.

**हे शहर जगते अनामिक ओढीने.....**

शहर म्हटलं की बकालता, प्रदूषण, एका बाजूला गगनाला भिडण्याची स्पर्धा लागलेल्या इमारती, तर दुसऱ्या बाजूला दु:ख, दैन्य, दारिद्र्य. शहर म्हटलं की धूर-धूळ यांचं साम्राज्य, रहदारीची कोंडी, गतिमान जीवन, धावपळ, दगदग, गुंडगिरी, वेश्याव्यवसाय अशा अनेक समस्या घेऊन चालणारे शहर. माणुसकीचा ऱ्हास, चांगुलपणाचा दुष्काळ, भावनाशून्य झालेल्या माणसांची गर्दी. अशी शहरं आज बघायला मिळतात. अशा या शहरांत राहणारी माणसंही गतिमान आणि भावशून्य झालेली दिसतात. शहराचं आणि या शहरी लोकांचं व्यक्तिमत्त्व अलग करणे शक्यच होत नाही. या सर्वच समस्यांचे दर्शन सुशीलकुमार शिंदे यांच्या सदर कवितेतून घडताना दिसते. 'शहर' या कवितेत कवी म्हणतात,

*कचऱ्याच्या ढिगाऱ्याखाली*
*या शहराने*

*भाड्याने ठेवलीत स्वप्ने, आशा आणि आकांक्षा*
*तीव्र इच्छेलाही असतो उग्र वास*
*घाणीसारखाच*
*सहन न होणारा आणि दडपताही न येणारा......* (पृ. क्र. ०१)

मराठी साहित्यात १९६० नंतर जशी स्थित्यंतरे झाली तशीच स्थित्यंतरे जागतिकीकरणाच्या रेट्यामुळे होताना दिसून येतात. महानगरीय जाणिवा साहित्यातून या काळानंतरच व्यक्त व्हायला लागल्या. नारायण सुर्वे यांच्या काव्यात येणारे महानगराचे चित्रण बकालतेबरोबरच वेश्येकडेही माणुसकीच्या ओलाव्याने पाहायला प्रवृत्त करते; परंतु आजच्या एकविसाव्या शतकातील महानगरीय जाणिवा टोकाच्या बोथट झालेल्या दिसून येतात. संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्यात सक्रिय असणाऱ्या अण्णा भाऊ साठे, अमर शेख व गवाणकर यांच्या काळची मुंबई व आजचे मुंबापुरी हे महानगर यात जमीन-अस्मानाचे अंतर दिसते. शाहीर पुंडलिक फरांदे यांनीही आपल्या 'सखा आणि तुका' या लोकनाट्यातून मुंबईतील गाळ्याचे (खोलीचे) वर्णन केले आहे. त्यांच्या लोकनाट्यातील सखा म्हणतो, ''खुली यवडंच वर बाकडं, खाली सतरा न् वर आठरा, मग काय उचारता, धोंड्याचं तंगडं पांड्याच्या तोंडावर आन् पांड्याचं कुबाड दगड्याच्या अंगावर. अगदी उशाला उसं आन् डोक्याला डोकं, परवातर हाऱ्यानं आपलं डोकं म्हणून पिऱ्याचंच डोकं खांजळायला सुरवात केली..... हे झालं खुलीचं - आन् हे बघ नळाव लाईन, संडासावं लाईन, दवाखान्यात लाईन, आरं दाढी करायला सुधा लाईन.... आमीच पळ काढायचा ठरविलाय इकडं आन् तू कशाला इतूयास तिकडं''[१] अरुण साधू यांची 'मुंबई दिनांक' ही कादंबरीतर मुंबईतील पूर्ण एका दिवसाचे वर्णन करते व मुंबई दररोज अशीच असल्याचे सांगायला लेखक विसरत नाहीत. मराठी काव्यातूनही ही जाणीव प्रकर्षाने येताना दिसते. दि. पु. चित्रे, नामदेव ढसाळ, अरुण कोलटकर, अशोक नायगावकर, वसंत आबाजी डहाके, वसंत गुर्जर, अरुण काळे, तुलसी परब, सतीश काळसेकर, एकनाथ पाटील आणि मनोहर ओक यांनी आपल्या काव्यातून मुंबईची वेगवेगळी रूपे मांडली आहेत. बाळासाहेब लबडे आपल्या 'मुंबई... बंबई... बॉम्बे.....' या कवितासंग्रहात मुंबईचे वर्णन करताना म्हणतात,

*मुंबई बंबई। लाखात चंदेरी*
*छळते अंधेरी हातबट्टी ॥*[२]



Scanned with CamScanner

पण आता ही जाणीव एकट्या मुंबईपुरती मर्यादित राहिलेली नाही. आर्थिक राजधानी मुंबईच्या नाल्यांची स्थिती पावसाळ्यात जशी चोकप होते तशी झाली आहे. आपल्या देशाच्या राजधानीनेतर नाका-तोंडाला मास्क लावलाय, (२०२० मध्येतर कोरोनाच्या प्रादुर्भावामुळे सारे जगच मास्कमय झाले आहे.) नागपूर उन्हात होरपळतोय तर सिमला बर्फात गुदमरतोय, महाराष्ट्राची सांस्कृतिक राजधानी असणाऱ्या पुण्याचीही हीच स्थिती झाल्याचे दिसून येते. कवी शिक्षणासाठी पुण्यात व नोकरी निमित्त ठाण्यात वास्तव्यास असल्याने कवीच्या कवितेतील शहरांची घुसमट पुणे, ठाणे व मुंबई या शहरांशी संबंधित असल्याचे दिसून येते. ही घुसमट सामाजिक, सांस्कृतिक, नैसर्गिक, आध्यात्मिक, आर्थिक, कृषी विषयक, वेश्यांशी संबंधित, धर्म, तत्त्वज्ञान, ग्रामीणतेची नाळ यांबरोबरच नातेसंबंध, त्यातील दुरावा, स्त्री-पुरुष यांच्यातील भेद या सर्वच पातळ्यांवर पाहायला मिळते. कवी हे जळजळीत वास्तव, परखड, उपहासात्मक व उपरोधिक पद्धतीने मांडत असला तरी त्याने आशावादही सोडला नाही, हे या काव्यसंग्रहात पाहायला मिळते. इंडिया आणि भारत यांच्या युद्धात भारताचाच विजय होताना दिसतो. जागतिकीकरणात खेड्यात राहणाऱ्या सामान्यांची कशी फरफट होते, याचे जाज्वल्य दर्शन या काव्यातून घडते.

**शहर आत्महत्या करायचं म्हणतंय....!**

सदर संग्रहातील 'हुकाला उलटी टांगलेली कोंबडी', 'बिनचेहऱ्याची माणसं', 'कूस बदलणारी शहरं', 'नाजूक बोट', 'सलमा', 'तूर्तास, दिसेल जागा तिथे पसर', 'आत्मा विकणे आहे'ची पाटी', 'शहर आत्महत्या करायचं म्हणतंय....!' ही शीर्षक कविता, या सर्व कविता सामाजिक भाष्यावर बोट ठेवताना दिसतात. भारतीय समाज जात, धर्म, भाषा, प्रांत, विषमता अशा अनेक सामाजिक प्रश्नांनी ग्रासलेली आहे. त्यात आता भर पडलेली आहे ती गर्भलिंग चाचणी करून गर्भात मुलगी असेल तर तिच्या भ्रूणाची हत्या करायची. कवीने या सामाजिक प्रश्नावर नेमके बोट ठेवले आहे. भ्रूणहत्या करणाऱ्यांची तुलना कवीने इस्माईल चाचाच्या मटण सेंटरशी केली आहे. अंड्याची कोंबडी किंवा गाभण जनावर चुकून जरी कापले गेले तरी हा इस्माईल हळहळतो, त्याच्या हाताला कापरे सुटते; पण आजचा सिव्हिलाइज्ड माणूस सुधारणेच्या नावाखाली किती मुर्दाड झाला आहे, हे कवी नेमक्या व नेटक्या शब्दांत व्यक्त करतो. कवीला

Scanned with CamScanner

'हुकाला उलटी टांगलेली कोंबडी' आणि पुरुषांच्या विकृतीच्या दावणीला बांधलेली 'बाई' या दोन्ही समानच वाटतात. कवी म्हणतात,

*फडफडणारी कोंबडी*
*रानोमाळ घेते धुंडाळा,*
*शोधत राहते हजारो सोनोग्राफी सेंटर*
*जिथे गरोदर बाया केल्या जातात खाली*
*पोटात काय आहे ते ठरवून* (पृ. क्र. ०५)

तर 'बिनचेहऱ्याची माणसं'मध्ये गावाकडच्या लोकांनी रोजगारासाठी शहर जवळ केले, त्यांच्या कष्टातूनच शहरे उभी राहिली, सजली, सुशोभित झाली; पण त्यांच्या कष्टाचा कुठेच नामोल्लेखही नसतो ही खंत व्यक्त होते. 'कूस बदलणारी शहरं....'मध्ये माणसांनाच लुटणारी माणसं पाहून कवीला ती जनावरे वाटू लागतात व ही माणसातील जनावरे शहररूपी जंगलात राहत असल्याचा भास त्यांना होतो. आधुनिकतेच्या नावाखाली आपण शहरं कशी वाढवली, फुगवली, बकाल केली याचे प्रत्यंतर 'तूर्तास, दिसेल जागा तिथे पसर' या कवितेतून घडते. तर शहरा-शहरांत वाढणाऱ्या वेश्याव्यवसायावर भाष्य करताना 'सलमा' कवितेतील वेश्येला उद्देशून कवी म्हणतो, 'सलमा, तुझं धाडस मोठं आहे बये'. ह्या वेश्या दिवसरात्र बलात्कार सहन करीत राहतात. म्हणूनच कवी तिच्या धाडसाला दाद देतो. शहरांमध्ये असे अनन्वीत अत्याचार अष्टोप्रहर चालू असतात त्यामुळेच कवीच्या मनातील 'शहर आत्महत्या करायचं म्हणतंय....!' शहराची व्यथा शब्दबद्ध करताना कवी म्हणतात,

*लोक दंगल करतात*
*लोक विटंबना करतात*
*लोक शाळेत मुलांना मारतात*
*बंदी बनवतात*
*बलात्कार करतात*
*हा अधम रक्तपात पाहून*
*शहर हळूहळू दुबळं बनत चाललंय* (पृ. क्र. २८)

खरंतर शहराकडे आकृष्ट झालेली लोकं स्वत:चा गाव सोडून कामधंद्यानिमित्त

Scanned with CamScanner

त्यांच्या समस्या मिटतात. मग ही मानवाला लुटणारी, स्त्रियांची लचके तोडणारी मानवी जनावरे कुठून येतात, असा प्रश्न वाचकांच्या मनात निर्माण होतो.

**अकाली मरण जवळ आलेले गाव**

ढगांच्या मादीने, कुणबीणबाई, डार्विन बाबा आणि त्याचे सूत्र, दाटीवाटीने उभी राहिलेली झाडे, पोक्या झालेला डोंगर, 'घुबड, म्हातारा लिंब आणि गाव', वाळूमुळे माणसाचं वाळवंट होणं, शाळा, माझा बाप अशा अनेक कवितांतून कवीने शेती-शेतकरी, गाव-गावगाडा, झाडे-वेली, डोंगर-दऱ्या, पशू-पक्षी यांचे सपाटीकरण करून माणूस शहरीकरण वाढवत असल्याची जाणीव करून दिली आहे. या काव्यसंग्रहातील कवितेतून आलेले बकाल झालेली शेती, रक्ताळलेली माती, कवडीमोल झालेला घाम, फिक्कट रक्त, कोरडी माती आणि गाभडलेली स्वप्ने, माळाच्या काळजाला फुटतो पाझर, कोरडाफट माळ, कॅन्सर झालेली माती, निसर्ग गिळणारा साथीचा रोग, डंपरला झाडांचा वास येतोय, माती झाड गिळल्याचा करपट ढेकर देतेय, प्लास्टिकचे थर, म्हातारा डोंगर, मरण जवळ आलेले गाव, हिरव्यागार शहरांचे रूपांतर सिमेंटच्या जंगलात, माणसांची मनंही वाळूची झालीत, वाळूमुळे माणसाचं वाळवंट होणं, दु:ख पिऊन गब्बर झालेला बाप ही सर्व प्रतिमा - प्रतिकात्मक काव्य चरणं माणसांचा आधुनिकतेचा हव्यास मांडताना दिसतात. व्यापाऱ्यांनी शेती नष्ट केली आणि दलालांनी शेतकरी संपवला. बिल्डरांनी सिमेंटची जंगलं रचली आणि गुंडांनी गरिबांना नाडलं आणि आपण हिरव्यागार शिवाराचे वाळवंट करीत निघालोय. शहरे बकाल होताहेत आणि गावं ओसाड पडत चालली आहेत. जल, वायू व ध्वनी प्रदूषणही जगासमोरील मोठी समस्या बनत आहे. यातूनच नवनवीन साथीचे रोग वाढत आहेत. हळव्या मनाचा कवी या सर्व संकटांची नव्या पिढीला जाणीव करून देत आहे. सुशीलकुमारांच्या कवितेबद्दल डॉ. किशोर सानप म्हणतात, 'जागतिकी-करणात माणसांचे होणारे वस्तूकरण, गावांची, शेतीवाडींची उलंगवाडी, दुष्काळ, नापिकी, कर्जबाजारीपण, आत्महत्या, कुटील गावठी राजकारण आदींमुळे भारतातून गावं हरवल्याची जाणीव कवीला अस्वस्थ करते. कवीची कुळंमुळं गावखेड्याच्या मातीत रुजलेली असल्यामुळे, रोजीरोटीसाठी तो महानगरी विसावलाय. शहरं, महानगरंही मृत्यूच्या विळख्यात बंदिस्त होत असल्याचे ग्लोबल वास्तव, सर्वहारा माणसांची अमानुषपणे होणारी कत्तल, धार्मिक दंगली,

Scanned with CamScanner

धर्मचिकित्सा, आदिम काल ते ग्लोबल काळापर्यंतची समाजाची वाटचाल, न्याय-अन्याय-विषमता आदींची विद्रोही चिकित्सा; कवीने आपल्या कवितेतून स्पष्टपणे केलेली आहे.'[१]

**वाचनीय आणि श्रवणीय गप्पा**

सदर काव्यसंग्रहातील 'बॅटरी अबाऊट टू डाय', 'मार्क्स वाचणारे शहर', 'मुके राहण्याचा गुन्हा', 'डार्विन बाबा आणि त्याचे सूत्र', 'मार्क्स आणि स्मिथ', 'भयाण रात्रीने', 'हौसाक्का' या कवितांतून संवेदनशील कवीचे मन आक्रंदन करताना दिसते. जगभरातील तत्त्ववेत्यांचे तत्त्वज्ञान शहरी वातावरणात मश्गूल असणाऱ्या 'ज्ञानवंतांनी' बासनात गुंडाळून स्वत:चे तत्त्वज्ञान पुढे केल्याचे दिसते. सोशल मिडीयावर आलेले 'ज्ञान' फॅरवर्ड करण्यात आज सर्वजण गर्क आहेत. त्यासाठी कवीने खूप छान शब्द वापरलाय - 'वाचनीय आणि श्रवणीय गप्पा' अशा अजगळ-पजगळ गप्पा मारण्यातच सर्वांच्या वेळेचा अपव्यय होतोय. कवी मात्र अशा गप्पांपासून अलिप्त राहतो; हे त्याचे निराळेपण आहे. कवीच्या आसपासचे शहरी लोक मात्र गोर-गरिबांवर अत्याचार करून उच्च-नीच, गरीब-श्रीमंत, स्पृश्य-अस्पृश्य असा भेदभाव करून -

*माणूस पचवून करपट ढेकर*
*देणारं हे गबरू शहर*
*आता निवांत वाचत बसलंय*
*मार्क्स बाबाचे दास कॅपिटल* (पृ. क्र. १०)

या कवितेतील 'गबरू शहर' ही प्रतिमा निर्ढावलेल्या शहरी लोकांसाठी कवी वापरतो. तर 'मुके राहण्याचा गुन्हा'मधून भारतीय आध्यात्मिक तत्त्वज्ञानही लोकांनी आत्मसात न केल्याची भावना व्यक्त होते. 'डार्विन बाबा आणि त्याचे सूत्र'मधून रासायनिक फवारण्या करून माणसांबरोबरच मातीलाही कॅन्सर होण्याची वेळ आली आहे, असा विचार कवी मांडतो. डार्विनचे विश्वाच्या निर्मितीचे सूत्र जाणणारा नागरी माणूसच आज डार्विनच्या भरवशावर -

*झाडांतून, फुलांतून आणि फळांतून*
*निसर्ग गिळणारा साथीचा रोग पसरत चाललाय सर्वदूर* (पृ. क्र. २६)

खरंच आजच्या मितीला कोरोना सारख्या महामारीने अखिल जगाला ग्रासले असताना या कवीचा वरील विचार पटताना दिसतो. पण हाही विचार लोक वाचणार

आणि विसरून जाणार. कोणताच सुविचार आजच्या हव्यासू माणसाला आत्मसात करावा असे वाटत नाही. ‘मार्क्स आणि स्मिथ’ या कवितेतूनही या तत्त्ववेत्यांचे तत्त्वज्ञान नागर लोकांनी फोल ठरविले आहे; त्यांची ‘प्रगती’ आणि ‘क्रांती’ हे शब्द शहरी माणूस सोईस्करपणे वापरतो. ‘भयाण रात्रीने’ या कवितेतून जगभरातील संस्कृतींचा ऱ्हास अशा मानवांनीच केल्याचे कवी सांगतो.

या सर्व कवितांना अपवाद म्हणजे ‘हौसाक्का’ ही कविता. म्हणूनच तिला उद्देशून कवी म्हणतो, ‘तू माणूस बनवलं आम्हाला मुक्तीच्या वाटेने चालणारा’(पृ. क्र. ५४) गावकुसाबाहेर राहणारी ही हौसाक्का परिवर्तनाची भाषा बोलते. बुद्धांचे तत्त्वज्ञान व आंबेडकरांचा विचार पचविणारी ही नायिका कवीने नागर लोकांपुढे उभा केली आहे. महापुरुषांच्या विचारांचा पराभव करणारे शहर व तोच विचार मातीत रुजविणारे गाव यांचे द्वंद्व या कवितेमुळे समोर येते. शेवटी ग्रामीण भागात (भारतात) राहणारी हौसाक्का केवळ श्रवणीय गप्पा मारणाऱ्या शहरी भागातील (इंडिया) लोकांना सरस ठरते.

### शहरातील रस्त्याला येतोय घामाचा वास

जगाच्या प्रारंभापासून आजतागायत चालत आलेला गहन व गंभीर प्रश्न म्हणजे कामकऱ्यांचे-कष्टकऱ्यांचे केले जाणारे शोषण होय. ग्रामीण भागातील वेठबिगारीपासून सावकारीपर्यंत व शहरी भागातील भांडवलदार, कारखानदारांपासून आजच्या बिल्डर व ठेकेदारांपर्यंत हे सर्वजण सर्वहारा समाजाचे शोषण करताना दिसतात. गावाचा असो किंवा शहरांचा असो त्यांचा विकास होताना त्याच्या पायामध्ये अनेकांचा बळी दिलेला दिसतो. या संग्रहातील ‘निजवत राहा तुझ्यातील बाईपण’, ‘दहा बाय दहाची खोली’, ‘मयत झालेली गिरणी’, ‘आम्ही मात्र शांत’, ‘धारावीची झोपडपट्टी’, ‘भंगारगल्ली’, ‘प्रेत’, ‘बळी’, ‘नाजूक बोटं’, ‘रस्ता’, ‘जिन्दगीची शाळा’, ‘शहर आणि समुद्र’ या कवितांतून कवीने स्त्रियांचे, गिरणी कामगारांचे, बालमजुरांचे कसे शोषण होते यांचे चित्रण केले आहे. तसेच विषमतेतून होणारी पिळवणूक दिसत असूनही हतबल झालेला समाज, जात-पात व धर्मांधतेत अडकलेला माणूस यांचे वास्तवदर्शी चित्रण केलेले आहे. काव्यसंग्रहाच्या प्रस्तावनेत डॉ. रणधीर शिंदे म्हणतात, ‘या महानगरांचा विकास विषम पद्धतीने झाला आहे. या मागे भांडवली उदारमतवादी जगाची व्यवस्था आहे. ती अंतर्विरोधावर उभी आहे. त्यामुळे आर्थिक सामाजिक विषमतेचा एक



Scanned with CamScanner

मोठा दीर्घ समूह शहरांत जगण्यासाठीची जीवघेणी धडपड करत राहतो. मूठभरांच्या सुखासाठी इमले रचणाऱ्या, घाम गाळणाऱ्या आणि चतकोर तुकड्यासाठी आणि हातभर निवाऱ्यासाठी हैराण झालेल्या मानवी समूहाचा स्वर या कवितेत केंद्रीय स्वरूपाचा आहे.'(पृ. क्र. १२, १३) शिंदे यांच्या या वाक्यांतून सर्वहारांच्या दु:खाचे प्रकटीकरण होते.

'दहा बाय दहाची खोली' या कवितेतून दु:खीत-पिडीत सर्वहारांची व्यथा कवीने नेमकेपणाने मांडलेली आहे. दहा बाय दहाच्या खोलीत दाटीवाटीने राहणारे सर्वहारा कुटुंब दिन-रात्र कष्ट करूनही दहा बाय दहाच्या बाहेरचा विचार करू शकत नाही. नवदांम्पत्याला एकांत मिळणे दुरापास्त झाल्याने काव्यातील नायक म्हणतो,

*भाकर तुकडा खाऊन घरातल्यांनी टेकवली पाठ*
*तेव्हा पलंगावर तिच्यासोबत झोपताना*
*दहा बाय दहाची घुसमट*
*हजारो इच्छांचा गुणाकार करून*
*करीत राहिली बलात्कार*
*आळीपाळीने रात्रभर माझ्यावर* (पृ. क्र. १८)

तो नायक आपल्या नायिकेसोबत पलंगावर निजतो खरा; पण भविष्याची चिंता, आई-बापाचा विचार करणाऱ्या नायकावरच इच्छा-आकांक्षा रात्रभर अत्याचार करीत राहतात. या प्रसंगातून सर्वहारांचे चिंताक्रांत मन दिसून येते. (आंतरराष्ट्रीय युवा दिनानिमित्त १२ जानेवारी २०१८ रोजी आमच्या किसन वीर महाविद्यालय, वाई येथे 'माझ्या लेखनातील समाजवास्तवाचे प्रतिबिंब' या विषयावर शिंदे यांनी व्याख्यान दिले होते. त्यावेळी आमच्या महाविद्यालयातील बी. ए. भाग-३ च्या विद्यार्थिनींनी त्यांची मुलाखत घेतली व नंतर सदर मुलाखत आमच्या 'कृष्णाई' या वार्षिक नियतकालिकात छापली होती.) त्यावेळी या कवितेविषयी बोलताना शिंदे म्हणले, 'शहर... हा कवितासंग्रह प्रसिद्ध झाल्यावर काही दिवसांनी मला दत्ता गायकर या वाचकाचे पत्र आले. त्यात त्यांनी या संग्रहातील काही कविता विशेष आवडल्याचे लिहिले होते. त्यानंतर काही दिवसांनी त्यांचा फोन आला. त्यांनी विचारले 'पत्र मिळाले का ?' मी हो म्हणालो. नंतर त्यांचा प्रश्न; 'काहो, तुम्ही कधी दहा बाय दहाच्या खोलीमध्ये राहिला आहात का ? मी आणि माझे कुटुंब तुम्ही कवितेत वर्णन केल्याप्रमाणे अगदी तसेच राहतोय. घरात दोन मुले,



Scanned with CamScanner

त्यांच्या बायका आणि आम्ही दोघे नवरा बायको. तुम्ही लिहिलेली ही कविता गेली कित्येक वर्ष आम्ही जगतो आहोत.' आपण प्रतिक्रिया म्हटले की कोणता साहित्यिक वा समीक्षक काय म्हणाला; यालाच महत्त्व देतो; पण आपण ज्यांना डोळ्यांसमोर ठेवून कविता लिहितो त्या वाचकाने दिलेली ही प्रतिक्रिया माझ्यासाठी अविस्मरणीय आहे आणि पुढील काळातही माझ्या वर्गचरित्राशी प्रामाणिक राहून लिहिण्यासाठीची ही मला प्रेरणा आहे असे वाटते.'[४] कवीच्या या वक्तव्यातून त्याची समाजाशी असणारी नाळ दिसून येते.

वरील सर्वच कवितांतून सर्वहारांच्या इच्छेविरुद्ध त्यांच्यावर होणारा अत्याचार कवीने मांडला आहे. सदर कवितांतून येणाऱ्या पुढील काव्यपंक्ती त्याचे प्रत्यंतर घडवतात. - तशी गांडच फाटली दहा बाय दहाच्या खोलीची, आता माणसापेक्षा जमिनीलाच मिळतो भाव, या नगराची इमारत फळाला यावी म्हणून, दिले गेलेत कित्येक बळी पायाशी, या शहरातील रस्त्याला येतोय घामाचा वास, पित राहते पेल्यावर पेले विषाचे, विषमतेचे आणि धर्मांधतेचे, झोपडपट्ट्या आडव्या आणि इमारती उभ्याच का वाढत राहतात ? तसेच विटाळलेल्या संकल्पना, आमच्या घामाचा चिकदा झाला, रक्ताळलेला कापूस, संसाराचं नागवेपन अशा नवनवीन प्रतिमा-प्रतिकांचा वापर करून कवीचे काव्य सर्वहारांच्या दु:खावर प्रकाश टाकते.

**उजेड पेरणाऱ्या मशाली अद्यापही कुणाच्याच गुलाम नाहीत**

कोणत्याही साहित्यिकाची साहित्यकृती हे त्याचे वाङ्मयीन व्यक्तिमत्त्व असते. सुशीलकुमार शिंदे नावाचा कवीही 'शहर आत्महत्या करायचं म्हणतंय...!' च्या पाना-पानांतून विचाररूपाने प्रकट होतो. कवीची प्रतिभा, काव्यलेखनाची भूमिका, समकालीन संदर्भ, कवी म्हणून त्याची झालेली जडणघडण, समाजाचा प्रतिभावंताकडे पाहण्याचा दृष्टिकोन, त्यांच्या अश्मयुगातील नोंदी, आदिम वर्षाची घुसमट, दु:ख, हे साहित्यदेवते, एबॉर्शन केलेल्या कविता, रक्ताळलेले शब्द, उजेड पेरणाऱ्या मशाली या कवितांतून स्पष्ट होतो. आदिमकाळापासून संत-महंत, विचारवंत, साहित्यिक यांना समाजकंटकांनी त्यांच्या हयातीत स्वीकारलेच नाही. त्यामुळे समस्त कविकुळाची घुसमट मांडताना कवी म्हणतो,

*कागदावर उतरले ते*
*निव्वळ शब्द नव्हतेच कधी,*



Scanned with CamScanner

*ती आदिम वर्षांची घुसमट*
*सांडत गेली अक्षरातून सहजपणे.* (पृ. क्र. ३७)

पण म्हणून कोणताही प्रबोधनकार साहित्यिक आपले विचार पेरण्याचे काम बंद करीत नाही. तो माणूस म्हणून कमी व कविमाणूस म्हणून जास्त प्रकट होतो. समाजासाठी, कविकुळासाठी तो कवितेतून स्वत:ची व्यथा मांडतो. तो शब्दाकार जसा आहे तसा विचारांचा शिल्पकारही आहे. शब्द रचता रचता तो शिल्पांतूनही व्यक्त होतो. आजच्या काळातही तो 'जागल्या'च्या भूमिकेत वावरताना दिसतो. स्वत:चे दु:ख झाकून हे प्रतिभावंत लोक -

*एकसारख्या घेत राहतात धडका*
*व्यवस्थेच्या ठेकेदारांशी*
*आणि जागवत राहतात माणूस*
*जमेल तसा, जमेल त्या ठिकाणी*
*कोणतं बरं दु:ख सलत असेल ह्यांच्या काळजात आदिम काळापासून....*

(पृ. क्र. ४१)

प्रतिभावंतांना आदिम काळापासून सलणारे दु:ख आजच्या २१व्या शतकातही सतावीत आहे; पण सगळेच साहित्यिक प्रामाणिकपणे साहित्यशारदेची सेवा करतील असेही नाही. काहीजण सन्मानासाठी व पुरस्कारासाठी सत्ताधाऱ्यांच्या वळचणीला उभे राहतात; हेही कटू असले तरी 'सत्य' आहेच की ! सुशीलकुमार नावाचा कवीमात्र या सगळ्या प्रलोभनांपासून दूर असल्याचेच दिसते. त्यामुळेच साहित्य आकादमीकडून पुरस्कार रूपाने मिळालेली रक्कम हा कवी सहजच समाजाला परत करतो. मराठी साहित्याच्या प्रांगणात पहिले पाऊल टाकतानाच या कवीची ही कृती साहित्यक्षेत्राला अचंबित करणारीच आहे. नाहीतर साहित्यिकांचे ओंगळ रूप मांडताना ' हे साहित्यदेवते' या कवितेत कवी म्हणतो,

*भरजरी वस्त्र अंगभर लपेटून*
*तू फिरून आलीस गाव.*
*तू साहस, तू शौर्य,*
*तू शृंगार, तू मादकता आणि असंच काहीसं.....*
*तुझ्या मागेपुढे करण्यातच खर्ची पडतात इथल्या लेखण्या,*
*पण तूचं सांग कल्पनेच्या जगात आम्ही किती काळ रमायचं ?*

(पृ. क्र. ४४)

'अश्मयुगातील नोंदी' आणि 'रक्ताळलेले शब्द' या दोन कविता वाचकांना डॉ. नरेंद्र दाभोलकर, कॉम्रेड गोविंद पानसरे, एम. एम. कलबुर्गी व गौरी लंकेश यांची आठवण करून देतात. डॉ. दाभोलकरांना जाऊन तर २० ऑगस्ट २०२०ला सात वर्षे झाली तरी त्यांचे मारेकरी सापडत नाहीत, याला काय म्हणायचे ? या जगात बुद्धिवादानं चालणं म्हणजे विषाची परीक्षाच समजायची का ? इथे ज्ञानेश्वरांपासून तुकोबांपर्यंत, महानुभावपंथातील कवी नरेंद्रापासून आजच्या नरेंद्र दाभोलकरांपर्यंत सगळ्यांनाच हे द्वेषाचे 'हलाहल' पचवावे लागले आहे. दाभोलकरांना सातव्या स्मृतिदिनी श्रद्धांजली वाहताना डॉ. श्यामसुंदर मिरजकर आपल्या 'न संपलेला माणूस' या कवितेत म्हणतात,

*कपाटामधील त्यांच्या पुस्तकांवरून नजर फिरवताना*
*विस्कटत गेली नरेंद्र दाभोळकर ही अक्षरे*
*'तिमिरातून तेजाकडे प्रवास करताना*
*हा बाप माणूस कायम सोबत असेल'*
*मी स्वत:शीच म्हणालो*
*अक्षरांचे दिवे करून*
*नव्या वाटा धुंडाळण्यासाठी चालू लागलो*[५]

खरंच माणूस असा कधीच संपत नाही गोळ्या घातल्या म्हणून. उलट तो विचाररूपाने अधिकच उजळून निघतो. समाज अशा प्रतिभावंतांची जिवंतपणी दखल घेत नाही; पण ते देहरूपाने गेल्यानंतर त्यांना स्वीकारतो. अशी गोळ्या घालून माणसं मरत असती तर - म. गांधी, संत तुकाराम, संत रोहिदास, दाभोलकर, पानसरे, कलबुर्गी, गौरी लंकेश यांची हत्या होऊनही ते प्रखरपणे जिवंत झाल्याचेच दिसते. कारण गांधी जसा विचार आहे, तसे वरील प्रत्येक नाव म्हणजे एक-एक विचार आहे. म्हणूनच मारेकऱ्यांना उद्देशून कवी म्हणतो,

*तू काल ज्याला मारलंस*
*त्याच्याच रक्तातून तयार झाल्यात सहस्त्र लेखण्या*
*तुक्या वाण्यासारखा विद्रोही आकांत पेरण्यासाठी*
*म्हणून तुला विचारले मित्रा,*
*तुझ्या अंगणात तू पाहिलेत का कधी रक्ताळलेले शब्द* (पृ. क्र. ५५)

या कवीने आपल्या शेवटच्या कवितेतील शेवटच्या चरणात म्हटलेलेच आहे.



Scanned with CamScanner

## माणूस पेटणं अपरिहार्य आहे

शिंदे नामक कवीने त्याच्या 'शहर आत्महत्या करायचं म्हणतंय.....!' या पहिल्या काव्यसंग्रहात नागरी समाजाची घुसमट, सर्वहारांचे दु:ख मांडले असले तरी; कवीचा दुर्दम्य आशावादही कवितांतून दिसून येतो. तो गावखेड्यातून आल्यामुळे त्याला 'काळ्या आईचे' खूपच आकर्षण आहे. तो महाराष्ट्रातील समस्त शेतकऱ्यांचे प्रतिनिधित्व करतोय, असे कविता अभ्यासताना जाणवते. साठ वर्षांपूर्वी मराठवाड्यातील सांगवीतून पुण्यात आलेला भालचंद्र नेमाड्यांचा नायक आणि जागतिकीकरणाच्या उंबरठ्यावर इंदापूर सारख्या ग्रामीण भागातून पुणे-ठाणे-मुंबई महानगरांत स्थिरावू पाहणारा कवी यांच्या मानसिक अस्वस्थतेमध्ये मला कमालीचे साम्य वाटते. कवीच्या खोल अंत:करणामध्ये ठाण मांडून बसलेले गाव त्यापासून अलग होत नाही. त्यामुळेच एका बाजूला -

*कधीकाळी काळ्या आईची सेवा करणारा*
*राबत राहतो दिवसरात्र*
*सिमेंटची जंगले उभी करण्यासाठी*
*त्याच्या वाट्याचे पाणी किती सहज पिऊन घेतात*
*तुमचे आकर्षक स्विमिंग टँक* (बिनचेहऱ्याची माणसं, पृ. क्र. ०८)

असे म्हणत असला तरी दुसऱ्या एका कवितेत शेतकऱ्याची व्यथा मांडून झाल्यावर तो आशावादही व्यक्त करताना दिसतो -

*मी पाहिलंय तुझ्या घामानं,*
*कोरडाफट माळ हिरवा शालू पांघरताना*
*कुणबीणबाई, मी पाहिलंय तुझ्या कष्टानं*
*काळी आई सवाष्ण होताना* ( कुणबीणबाई, पृ. क्र. १७)

शहरात सारंच ओंगळ, बिभत्स, भयावह आहे असेही नाही, हे कवी आवर्जून सांगतो. विंदा करंदीकरांच्या 'माझ्या मना बन दगड' या कवितेमध्ये शेवटच्या कडव्यात जसा आशावाद व्यक्त होतो; तसाच आशावाद या संग्रहातील 'सूर्यबीज डोळ्यात साचवलेली माणसं' या कवितेतून व्यक्त होतो. सूर्याचे तेज डोळ्यात साठवून युगप्रवर्तकाची वाट पाहणारा माणूस सारी वेदना, विद्रोह मनात साठवून आहे -



Scanned with CamScanner

*पण लक्षात ठेव,*
*कदाचित उद्या सूर्यबीज डोळ्यात साचवलेली माणसं,*
*येतील याच वाटेने,*
*त्याचसाठी, दूर कोण्या गावात बेचिराख झालेली झोपडी*
*पदरात बांधून आहे धुमसणारा विद्रोह*

(सूर्यबीज डोळ्यात साचवलेली माणसं, पृ. क्र. २९)

कारण त्याला माहिती आहे बदल घडवायचा असेल तर स्थिर राहून हा मनातील विद्रोह प्रज्वलित ठेवावा लागेल. या ठिणगीचाच पुढे वणवा होऊन शोषणकर्त्यांना नेस्तनाबूत करेल. त्यांच्या कवितेतील 'हौसाक्का' तर ग्रामीण भागातील 'रणरागिणीचे' रूप घेऊन कामकरी स्त्रियांचे प्रतिनिधित्व करताना दिसते. आणि शहरातील देहविक्रय करणारी सलमा नारायण सुर्वे यांच्या 'नेहरू गेले त्यावेळची गोष्ट' या कवितेतील वेश्येसारखी आशावादी दिसते म्हणूनच कवीला सलमा धीराची वाटते. अशा आशावादी लोकांचे संघटन झाले तरच ही व्यवस्था उलथून टाकता येईल, हेही कवीला माहिती आहे -

*हजारो वर्षांची भिंत तुझ्या एका धडकेने नाही तुटणार कदाचित,*
*पण तुझे सांडलेले रक्त सांगत राहील कहाणी...*
*आणि बळी जाणाऱ्यालाही येत राहील बळ*
*जाब विचारण्याचे.* ( जाब, पृ. क्र. ५८)

अशी माणसं प्रतिकारासाठी पुढे आल्याशिवाय परिवर्तन होणार नाही. संघटित होऊन प्रतिकार केल्याशिवाय बदल होणे अशक्यच आहे. त्यासाठी माणसांनी आपला विवेक जागृत ठेवून वाचन, मनन, चिंतन करून 'जागृत' राहणे गरजेचे आहे. स्वत:च्या विश्वामध्ये आत्मकेंद्रित होण्याऐवजी थोडे आजूबाजूच्या शोषितांसाठी उठाव करणे गरजेचे आहे. परिवर्तनासाठी माणसांनी सज्ज होण्यासाठी कवी म्हणतो,

*'माणसांचा बोन्साय बनण्याचा काळ तेजीत असताना....*
*आता माणूस पेटणं अपरिहार्य आहे.'* (पृ. क्र. ६२)

**समारोप**

अशाप्रकारे सुशीलकुमार शिंदे या नवकवीच्या ५३ कविता त्याच्या 'शहर आत्महत्या करायचं म्हणतंय.....!' या पहिल्याच काव्यसंग्रहातून वाचकांचे मन वेधून घेतात. शहरीकरणाच्या कचाट्यात सापडलेला माणूस व त्याची होणारी



Scanned with CamScanner

घुसमट हा कवितेचा केंद्रबिंदू असला तरी कवीने सामाजिक वास्तव, स्त्रियांची कुचंबणा, आध्यात्मिक घुसमट, शेतकऱ्यांच्या व्यथा, वेश्यांच्या समस्या, मातीचे दु:ख, सांस्कृतिक ऱ्हास या समस्यांवर काहीअंशी उपहासात्मक व उपरोधिक पद्धतीने प्रकाश टाकला आहे. उदा. 'न माणसाळलेले कावळे' ही कविता. ह्या सगळ्या समस्या मांडताना कवीची घुसमटही शब्दा-शब्दांतून जाणवते. गावांचे होणारे शहरीकरण, माणसांचे होणारे राक्षसीकरण हे कवी तळमळीने मांडतो. 'शहर' या पहिल्या कवितेतून 'या शहराने, भाड्याने ठेवलीत स्वप्ने, आशा आणि आकांक्षा' असे म्हणणारा कवी शेवटच्या 'उजेड पेरणाऱ्या मशाली' या कवितेत 'उजेड पेरणाऱ्या मशाली अद्यापही कुणाच्याच गुलाम नाहीत' असे म्हणतो तेव्हा वाचकांना कवितेचा घुसमटीपासून आशावादापर्यंतचा प्रवास जाणवतो.

**संदर्भ टीपा**


१) शाहीर फरांदे पुंडलिक कृत : 'सखा आणि तुका' लोकनाट्याच्या ध्वनिमुद्रित सीडीतून.

२) पाटील आशुतोष (संपा.) : 'कविता रती', जानेवारी-फेब्रुवारी २०१९, पृ. क्र. ४८.

३) सानप किशोर : 'युगांतराची कविता', ग्रंथाली प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, २०१९, पृ. क्र. ३३८.

४) थोरात संग्राम (संपा.) : 'कृष्णाई' नियतकालिक २०१७-१८, पृ. क्र. ५८.

५) http:#shyamsundarmirajkar.blogspot.com/2020/08/blog-post.html

६) शिंदे सुशीलकुमार : 'शहर आत्महत्या करायचं म्हणतंय..!', ग्रंथाली प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, २०१६



**- प्रा. डॉ. संग्राम गोपीनाथ थोरात,**

साहाय्यक प्राध्यापक, मराठी विभाग,

किसन वीर महाविद्यालय, वाई.

ईमेल - sangramthorat750@gmail.com

मोबा. : ९६०४०४६०८४


★ ★ ★



Scanned with CamScanner